**EXAMINATION STRUCTURE FOR MARATHI – CODE 009**

**CLASS : IX**

**FIRST TERM (APRIL 2011 – SEPTEMBER 2011) SA I**

| **SECTION** | **DETAILS OF TOPICS/CHAPTERS** | **TYPES OF QUESTIONS** | **NO. OF QUESTIONS** | **MARKS** |
|---|---|---|---|---|
| SECTION – A<br><br>READING | Comprehension<br>Two Unseen Passages of 500 words each. | Passage I:<br>M.C.Q.<br>S.A.<br>Passage II:<br>M.C.Q.<br>S.A. | <br>1<br>2<br><br>1<br>2 | <br>1<br>4+3<br><br>1<br>3+3<br>**Total=15** |
| SECTION – B<br><br>WRITING | Composition<br>Paragraph Writing on Familiar topics.<br>1. With the help of given points.<br>2. Without the help of given points | S.A.<br>S.A. | 1<br>1 | 1X8=8<br>1X7=7<br><br>**Total=15** |
| SECTION – C<br><br>GRAMMAR | 1. Recognition of parts of speech.<br>2. Transformation of sentences<br>3. Synonyms<br>4. Explanation of Idioms & Proverbs. | V.S.A.<br>V.S.A.<br>V.S.A.(M.C.Q.)<br>S.A. | 5<br>5<br>5<br>1 | 5X1=5<br>5X1=5<br>5X1=5<br>1X5=5<br><br>**Total=20** |
| SECTION – D<br><br>LITERATURE | **<u>Prose:-</u>**<br>L-1 Chittachi Ekagrata<br>L- 2 Babanche Vyakranch kachche<br>L- 4 Bhet<br><br>**<u>Poetry:-</u>**<br>Poem 2 Manavata<br>Poem 3 Mi Gharat Ne<br>Poem 4 Hit Vhave<br><br>**<u>Supplementary Reader:-</u>**<br>L- 1 Nashikne Manleli Aaji<br>L- 2 Aamche Master | S.A.<br>S.A.<br><br>S.A.<br>S.A.<br><br>L.A.<br>L.A. | 1<br>2<br><br>1<br>2<br><br>1<br>1 | Explanation<br>5 Marks Questions<br>2X5=10<br>**Total=15**<br><br>Explanation<br>5 Marks Questions<br>2X5=10<br>**Total=15**<br><br>1X6=6<br>1X4=4<br>**Total=10** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **Total=40** |
| **TOTAL** | | | | **90 Marks** |

C.B.S.E. 17 R.A. New Delhi

Class : IX

Sample Paper

( For Summative Assessment) SA I

MARATHI –CODE-009

M.M. 90 TIME : 3 hrs.

This question paper divided into four sections :

| | | | |
|---|---|---|---|
| SECTION | A | Reading | 15 marks |
| SECTION | B | Writing | 15 marks |
| SECTION | C | Grammar | 20 marks |
| SECTION | D | Literature | 40 marks |

. All question are compulsory.

. Marks are indicated against each question.

.. This question paper is consists of 6 pages.

MARATHI –CODE-009

SUMMATIVE ASSESSMENT (SA I)

CLASS-IX

FIRST TERM ( APRIL 2011-SEPTEMBER 2011 )

SAMPLE QUESTION PAPER

## SECTION – A (READING)

Q.1 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.

'निसर्ग आमुचा सखा' म्हणून माणूस नेहमी निसर्गाचा गौरव करत आला आहे; पण हाच माणूस आपल्या अविचारी कृतीने निसर्गाला वेदना देत असतो. कधी तो प्रचंड वृक्ष तोड करतो; कधी हवेत दूषित वायू सोडतो; तर कधी कारखान्यांचे मलीन पाणी नदयांच्या गोडया पाण्यात सोडून सारे पाणी दूषित करतो . स्वाभाविकच त्याचा मित्र असलेला निसर्ग त्याच्यावर संतप्त होऊन रौद्र रूप धारण करतो . या निसर्गाच्या संतापाचे एक रूप म्हणजे भूकंप .

आता वैज्ञानिकांनी भूकंपाची शास्त्रीय कारणे शोधून काढली आहेत . पण कधी कधी या शास्त्रज्ञांच्या कल्पनांनाही धक्का बसतो . सहयाद्रीच्या दख्खन पठारावरील खडकात भक्कमपणा अधिक असल्यामुळे तेथे भूकंप कधी होणारच नाही , असे सर्वजण मानत होते; पण काही वर्षापूर्वी घडलेल्या कोयनेच्या परिसरातील भूकंपांने व नुकत्याच झालेल्या लातूरच्या भूकंपाने या कल्पनेला धक्का दिला आहे .

सप्टेंबरचा शेवटचा दिवस . पावसाळा जवळजवळ संपत आला होता . शेतीतील कामे संपल्यामुळे गावकरी गणपतीच्या सणात रमले होते. अंनतचतुर्दशीला गणपतींचे विसर्जन करून तृप्त मनाने ते रात्री आपल्या घरकुलात गाढ झोपले होते; पण ती रात्र त्यांना काळ रात्र ठरली. भल्या पहाटे अचानक जमीन हादरू लागली आणि दगडमातीचे ती घरे पत्याच्या बंगल्यासारखी कोसळली . घरांच्या भिंतीसाठी वापरलेले मोठमोठे चिरे गाढ निद्रेत असलेल्या लोकांच्या अंगावर कोसळले आणि त्यांची निद्रा चिरनिद्रा ठरली. नांदत्या गावांना स्मशानाचे स्वरूप आले होते . मृत्यूचे भीषण तांडव सुरू झाले होते . सगळीकडे हाहाकार उडाला होता सर्वजण या भूमातेच्या कोपाने सुन झाले होते . अल्पावधीतच ही वार्ता जगाच्या कानाकोप-यांत जाऊन पोहचली आणि मदतीचे अनेक हात तत्परतेने पुढे आले .

1) "सहयाद्रीच्या दख्खन पठारावरील..." या वाक्यात 'पठार' या शब्दाचा नेमका अर्थ पुढील कोणता आहे (1)

i) पर्वताच्या माथ्यावरील सपाट भाग

ii) पर्वतशिखर

iii) पर्वताचा उतार

iv) पर्वताचा पायथा

2) माणूस आपल्या कोणत्या कृतींनी निसर्गाला वेदना देत असतो ? (3)

3) अनंतचतुर्दशीच्या रात्री लातूरला काय घडले ? (4)

Q.2 पुढील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा -

भारत हा एक विशाल देश आहे. या देशात विविध धर्मांचे, जातींचे , पंथांचे लोक राहतात . किंबहुना या विविधतेचा आपल्याला अभिमान वाटतो . पण काही वेळेला आपले वर्तन हे याचाशी विसंगत असते , लाजिरवाणे असते . माझी जात श्रेष्ठ , इतर माझ्यापुढे कनिष्ट असे काहींना वाटत असते . काही लोकांना इतरांचा स्पर्श , इतरांची सावलीही रूचत नाही . हे असे का घडते ? या मागे कोणते कारण असावे ? खरे तर सामाजिक जीवन सुव्यवस्थित राहावे , म्हणून आपल्या पूर्वजांनी कामांची विभागणी केली . त्यावरून आपण वेगवेगळया जाती मानू लागलो. कालांतराने या जाती जन्मावरून वाटयाला येऊ लागल्या . मग त्यांतून समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठता ठरू लागली. हेच सामाजिक विषमतेचे मूळ आहे .

एक गोष्ट नक्की की , कामाची विभागणी ही केवळ सोय आहे . कुणीही श्रेष्ठ नाही , कुणीही कनिष्ठ नाही . दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही काम हे कमी प्रतीचे नाही ,

हलके नाही . असे काम करणा-याला कनिष्ठ मानणे अगदी चूक आहे , हे जाणूनच आपल्या घटनेने सर्वांना समान हक्क दिले आहेत . प्रत्येकाला आपल्या विकासाची समान संधी आहे .

जाती , धर्म , पंथ , वर्ण यांवरून समाजात जशी विषमता केली जाते तशीच विषमता , तसाच भेदभाव काही वेळला आर्थिक स्थितीवरूनही केला जातो . अनेकच धनिक स्वतःला गरिबांपेक्षा श्रेष्ठ समजतात . मालक नोकरांना तुच्छ लेखतात . काही ठिकाणी आजही जमीनदार आपल्या सेवकांना गुलामाप्रमाणे वागवतात . सावकार ऋणकोंची गळचेपी करतात . अशा त-हेचे वर्तन समाजाची निकोप वाढ होण्याच्या दृष्टीने घातक ठरते .

1) पुढील पैकी कोणत्या गटातील शब्द सर्व विशेषणे आहेत ? (1)

i) विशाल , धर्म , वाटतो , जन्म

ii) लाजिरवाणे , त्यावरून कुणीही , विषमता

iii) कनिष्ठ , समान , आर्थिक , निकोप

iv) कालांतराने , चूक , स्वतःला , आजही

2) आपले वर्तन लाजिरवाणे केव्हा ठरते ? (3)

3) कोणकोणत्या प्रकारे माणसामाणसांत भेदभाव केला जातो ? (3)

## SECTION – B (WRITING)

## COMPOSITION

Q.3 निसर्ग माझा सोबती या विषयावर खालील मुददयांचा वापर करून परिच्छेद लिहा . (8)

( मुद्दे - लहानपणीचे सवंगडी - मोठेपणीचे दोस्त -झाडे , पाने , फुले , चांदोवा ,

सूर्य यांच्यापासून मिळणारा आनंद - फुलपाखरे , पक्षी , प्राणी , नदी , समुद्र यांच्या सहवासात मिळणारा आंनद - कोसळणारा पाऊस , धुक्यात लपेटलेला डोंगर . )

Q.4 खालील पैकी कोणत्याही एका विषयावर परिच्छेद लिहा . (7)

a) अति तेथे माती .

b) इकडे आड तिकडे विहीर .

c) शहाण्याला शब्दाचा मार.

## (SECTION – C (GRAMMAR)

Q.5 a) राधा रोज संध्याकाळी फिरायला जाते . (या वाक्यातील कर्ता ओळखा.) (5)

b) आकाशात भिरभिरणारी पाखरे झाडावर येऊन बसली .(विशेषण अधोरेखित करा.)

c) वहीण आत येऊन न बोलता उभी राहिली . ( क्रियापद ओळखा.)

d) ती लगबगीनेच त्याच्या घरी पोहचली . ( क्रियाविशेषण ओळखा.)

e) अबब! केवढी प्रचंड इमारत ही ! (केवलप्रयोगी अव्यय ओळखा.)

Q.6 पुढील वाक्ये कसांतील सूचनांप्रमाणे बदलून लिहा . (5)

a) रमणने झाडावरील पक्षी मारला . ( कर्तरी वाक्य करा.)

b) भल्या पाहाटे गवळी दूध घेऊन येतो. (भूतकाळ करा.)

c) त्याची सभेत फार वाहवा झाली . ( भविष्यकाळ करा.)

d) जापान मध्ये भूकंपामुळे समुद्रात सुनामी लाटा उचंबळल्या . (वर्तमानकाळ करा)

e) तानाजी हा शूर सरदार होता . तानाजी विश्वासू होता .

(दोन्ही वाक्य जोडून एकच वाक्य तयार करा .)

Q.7 खालील शब्दाचे प्रत्येकी दोन समानार्थी शब्द लिहा . (5)

a) आकाश

b) फूल

c) चंद्र

d) सूर्य

e) जमीन

Q.8 खालील पैकी एका म्हणीचा किंवा वाक्प्रचाराचा संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. (5)

आकाश ठेंगणे होणे .

किंवा

बळी तो कान पिळी .

## SECTION-D (LITERATURE)

Q.9 खालील पैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासहित स्पष्टीकरण द्या . (5)

" विचारांची चक्रे जोराने थांबल्याशिवाय एकाग्रता कोठली ?"

किंवा

" वाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो . तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य ."

Q.10 पुढीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा . (2×5=10)

a) बंडूवर कोण रागवले ?

b) ' बाबांचे व्याकरण कच्चे ' ! असे बंडूला का वाटले ?

c) वारकरी पंथासंबंधी संत तुकाराम महाराजांचे विचार सांगा ?

Q.11 खालील पदयपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा . (5)

" अवघ्या अभाग्यांचे अश्रू |
उभे आमच्या डोळयात ."||

किंवा

" इथे सारे सारे नवे पेरताना
वामनापरी मी तुझे हात व्हावे ."

Q.12 खालील पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा . (2×5=10)

a) ' मी घरात आले ' या कवितेतील स्त्रीचा कोणकोणाशी संवाद झाला ?

b) सामान्य माणसाचे दुःख 'हित व्हावे' या कवितेत कवीने कसे दाखविले आहे ?

c) माणसाच्या जीवनात कोणते बदल व्हावेत असे 'हित व्हावे' या कवितेत कवीला वाटते .

Q.13 लक्ष्मीबाईना 'नाशिकची आजी' म्हणावे असे दुर्गाबाईना का वाटते ? (6)

Q.14 मास्तरांनी लंबोदरचे कौतुक कोणत्या शब्दात केले ? (4)